# डॉ. बाळासाहेब सावंत कोकण कृषि विद्यापीठ, दापोली

## आजपर्यंत विद्यापीठांनी संयुक्त कृषि संशोधन व विकास समितीव्दारे संशोधन शिफारशी केलेले पिकनिहाय तंत्रज्ञान

| **पीक व वाण** | : | **सुरण** |
|---|---|---|
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २००८** |
| किड व्यवस्थापनाबद्दल शिफारशी | : | सुरणाचे गोगलगाईपासून संरक्षण करण्याकरिता पंधरा दिवस अगोदर मुख्य पिकाभोवती मिश्रीकंदाची संरक्षक ओळ म्हणून लागवड करावी आणि खबरदारीचा उपाय म्हणून मिश्रीकंद बियाणाची भुकटी अधिक रिठा बियांचा अर्क प्रती लीटर पाण्यात ५० ग्रॅम घेवून त्याच्या द्रावणाची फवारणी मुख्य पिकावर करावी. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१६** |
| लागवडीविषयी तंत्रज्ञान व शिफारशी | : | १. कोकणामध्ये खरीप हंगामात सुरण पिकापासून अधिक उत्पादन आणि निव्वळ नफा मिळविण्यासाठी गजेंद्र या जातीची लागवड करावी.<br>२. कोकण विभागात सुपारी बागेतून अधिक उत्पादन व निव्वळ नफा मिळविण्यासाठी सुरण किंवा आले किंवा हळद या पिकाची आंतरपिक म्हणून लागवड करावी. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१७** |
| पीक व्यवस्थापनाबद्दल इतर शिफारशी | : | पूर्ण वाढ झालेल्या काजू बागेतून कोकण विभागात अधिक आर्थिक लाभ मिळविण्यासाठी खरीप हंगामामध्ये सुरण किंवा घोरकंद या कंदपिकांची आंतरपिकासाठी शिफारस करण्यात येत आहे. |
| **शिफारशींचा तपशिल (वर्षनिहाय)** | : | **वर्ष - २०१८** |
| लागवडीविषयी तंत्रज्ञान व शिफारशी | : | दक्षिण कोकण विभागात तेल ताडाच्या बागेत सुरुवातीच्या कालावधीत (५ वर्षापर्यंतत) किफायतशीर उत्पन्नाकरिता केळी, अननस आणि सुरण या पिकांची मिश्रपिक म्हणून लागवड करण्याची शिफारस करण्यात येते. |